**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३४/२०२३.**

(जुना क्र.३८/२०२१.)

शंकर विठोबा शिगवण वगैरे वि.

सुनिता कृष्णकुमार मेता वगैरे

CNR NO.MHRG180012812023

**निशाणी क्र.१३ वरील आदेश**

(पारीत दि.०५.०९.२०२४ रोजी)

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज सामनेवालाचे वारस अभिलेखावर आणता न आल्यामुळे झालेली अबेटमेंट रद्द होवून मिळणेसाठी दिलेला आहे. अर्जातील हकीकत अशी की, सामनेवाला सुनिता कृष्णकुमार मेता या दि.२६.०७.२०२२ रोजी मयत झाल्या आहेत. मयताचे वारसांची माहिती मिळविण्यास विलंब झाल्याने अर्जदार यांना मुदतीत मयताचे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झाला व त्यामुळे अर्ज अबेट झाला आहे. सबब, झालेली अबेटमेंट रद्द न झाल्यास अर्जदार यांचे अपरिमीत नुकसान होणार आहे. त्यामुळे अबेटमेंट रद्द व्हावी अशी त्यांची विनंती आहे. याकामी सामनेवाला यांनी म्हणणे दाखल केले नसल्याने अर्ज विना म्हणणे चालविण्यात आला आहे.

०२. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जाचे पुष्ट्यर्थ अर्जदार यांनी शपथपत्र दाखल केलेले आहे. अर्जदारने निशाणी क्र.१८/१ कडे सामनेवाला सुनिता कृष्णकुमार मेता यांचा मृत्यु दाखला दाखल केला आहे. सामनेवाला दि.२६.०७.२०२२ रोजी मयत झाल्याचे त्यातुन दिसुन येते. वास्तविक कायद्याप्रमाणे मृत्यूनंतर ९० दिवसांच्या आत वारस अभिलेखावर आणणे आवश्यक असते. परंतु प्रकरण दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ३९, नियम २अे तरतुदीनुसार अवमान व उल्लंघनाशी संबंधीत आहे त्यामुळे विलंब माफ करणे योग्य व न्यायाचे होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

अर्ज मंजूर करण्यात येतो आणि अबेटमेंट रद्द करण्यात येते.

स्वाक्षरी/-

माणगांव. (एम. ए. पठाण)

दिनांकः ०५.०९.२०२४. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, माणगांव.